पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण यांचे कार्यालय,
चव्हाणनगर पाषाण रोड, पुणे -४११००८
दुरध्वनी क्रमांक-०२०-२५६५७८७८ फॅक्स क्रमांक-०२०-२५६७४६४१
ई मेल- sp.pune.r @maha.gov.in.
(आस्थापना शाखा)

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# पुणे ग्रामीण चालक पोलीस शिपाई भरती-२०२१ कागदपत्र पडताळणी करिता सुधारित तात्पुरती निवड व प्रतिक्षा यादी वरील उमेदवार उपस्थित राहणेबाबत.

## ( उमेदवारांकरीता सुचना )

*******

- पुणे ग्रामीण आस्थापनेवरील सन २०२१ मध्ये रिक्त असलेल्या ९० चालक पोलीस शिपाई पदासाठी घेण्यात आलेल्या मैदानी चाचणी व लेखी परिक्षेमध्ये जे उमेदवार विहीत गुणांनी उत्तीर्ण झाले असून, सामाजिक व समांतर आरक्षणाच्या आधारे पात्र ठरले आहेत, अशा उमेदवारांची कागदपत्र पडताळणीचे अधीन राहुन तात्पुरती निवड यादी व प्रतिक्षायादी ही मुळ कागदपत्रे / प्रमाणपत्रे व भरती निकषांची पुर्तता यांच्या अधीन राहून आणि सा.प्र.विभाग, शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही-१०९७/प्रक्र ३१/९८/१६-अ, दि. १६/०३/१९९९ शासन शुध्दीपत्रक क्र.संकीर्ण-१११८/प्रक्र.३९/१६-अ, दि.१९/१२/२०१८, शासन निर्णय क्र पोलीस-१८१९/प्र.क्र.३१६/पोल-५अ, दि.१०/१२/२०२० व महाराष्ट्र सहायक पोलीस उपनिरीक्षक चालक, पोलीस हवालदार चालक, पोलीस नाईक चालक व पोलीस शिपाई चालक (सेवाप्रवेश) नियम २०१९ मधील तरतुदीनुसार यासोबत संलग्न करून कार्यालयाचे संकेतस्थळ https://puneruralpolice.gov.in तसेच पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे https://www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली होती.
- सदर यादीतील निवड झालेले व प्रतिक्षायादीतील उमेदवारांची सर्व मुळ कगदपत्रे व प्रमाणपत्रांची विहीत शासन निर्णय, परिपत्रके, जाहिरात व पोलीस भरती कार्यपध्दती मधील निर्देशानुसार फेरपडताळणी करिता निवड व प्रतिक्षा यादीतील उमेदवारांनी ६ पासपोर्ट साईझ फोटो तसेच भरती संदर्भातील सर्व मुळ कागदपत्रांसह व सदर कागदपत्रांच्या छायांकित सत्यप्रतीच्या दोन संचासह दि. २५/०४/२०२३ व २६/०४/२०२३ रोजी सकाळी १०:०० वा. पोलीस मुख्यालय, पुणे ग्रामीण येथे न चुकता हजर रहावे. कागदपत्र पडताळणीत उमेदवार गैरहजर राहील्यास त्यांचे नाव निवड / प्रतिक्षा यादीतून वगळण्यात येईल.
- कागदपत्र पडताळणी पुर्ण झाल्यानंतर कागदपत्रे पडताळणीमध्ये पात्र ठरलेल्या उमेदवारांची अंतिम निवड यादी शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार प्रसिध्द करण्यात येईल.
- तात्पुरत्या निवड यादीमधील निवड ही भरती प्रक्रियेशी निगडीत निकषांचे पुर्ततेच्या अधीन असून पुर्न:पडताळणी अंती एखादा उमेदवार अपात्र झाल्यास त्या-त्या प्रवर्गाच्या निवड यादीमधील नाव रद्द करण्यात येवून त्यांना भरती प्रक्रीयेतुन / निवड यादीतून बाद करण्यात येईल त्याबाबत उमेदवाराचा कोणताही दावा, तक्रार अगर हक्क राहणार नाही याची नोंद घ्यावी.
- तात्पुरत्या निवडसूचीतील त्या-त्या यादीतील निवड झालेले सामाजिक / समांतर आरक्षणातील उमेदवार पुढील टप्प्यावर अगर इतर कारणास्तव अपात्र झाल्यास किंवा उपलब्ध न झाल्यास त्या-त्या प्रवर्गाच्या प्रतिक्षा यादीतील उमेदवारांमधुन वरिष्ठतेनुसार उतरत्या क्रमाने भरण्यात येतील.

D:\SB-03 RAHUL\POLICE BHARTI 20-21\PC POLICE BHARTI 20-21 RAHUL\AFTER WRITING EXAM LETTER 2023.DOCX

➢ भरती प्रक्रीये दरम्यान आवश्यक ते बदल / निर्णय घेण्याचे अधिकार पोलीस भरती निवड मंडळाकडे राखून ठेवण्यात येत आहेत.

(अंकित गोयल) भा.पो.से.
पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण
तथा अध्यक्ष,
पोलीस भरती निवड मंडळ.

**प्रत माहितीस्तव सादर:-**

मा. अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई
मा. विशेष पोलीस महानिरीक्षक,कोल्हापूर परिक्षेत्र कोल्हापूर
पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य कार्यालय, मुंबई
२/- पोलीस उपअधीक्षक यांनी सोबतची संलग्न केलेली यादी पोलीस महासंचालकांच्या https://www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर १५ दिवसांकरिता उपलब्ध करावी